# गृहविज्ञान शिक्षणातून महिला सक्षमीकरण

**दिपाली विजय पाटील** सहायक प्राध्यापिका, गृहशास्त्र विभाग, कमला कॉलेज, कोल्हापूर

---

**सारांश :-**

गृहजीवनाशी संबंधित व सर्वपरिचित असलेला महत्त्वाचा विषय म्हणजे गृहविज्ञान होय. मानवी जीवन सुखी, समृद्ध व स्वास्थ्यप्रत बनवण्याचा क्षमतेचा व कौशल्याचा विकास करणे हे या विषयाचे मुख्य उद्दिष्ट आहे.घर व कुटूंब तसेच या समाज व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण घटक असणारी महिलानां सक्षम, सबल, आत्मनिर्भर, समृद्ध,करण्याचे काम या विषयाच्या शिक्षणातुन केले जाते.या विषयात गृह व्यवस्थापन, गृहसजावट, आहारशास्त्र, वस्त्र शास्त्र, बालविकास, विवाह आणि कौटुंबिक संबंध, उपभोक्ता ग्राहक अर्थशास्त्र, स्वयंरोजगार इ घटकाचे महत्त्वपूर्ण शिक्षण दिले जाते. त्यामुळे महिलांना आर्थिक, सामाजिक, कौशल्य आणि स्व विकासाचे अनेक मार्ग खुले झाले आहेत. गृहविज्ञानाचे शिक्षण स्त्रियांना फक्त शिक्षित करत नाही तर तिला निर्णय घेण्यास, कुटुंबातील व कुटुंबाबाहेरील जबाबदाऱ्या स्वीकारण्यास सक्षम करते. या विषयाचे शिक्षण महिलांना अनेक रोजगाराच्या संधी, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देते.त्यामुळे महिला सक्षम तर होतात त्याचबरोबर आत्मनिर्भर व स्वावलंबी बनतात.तसेच महिलांना आर्थिक, भावनिक, मानसिक, बौद्धिक, शारीरिक दृष्ट्या सुदृढ करण्याचे कार्य केले जाते .कला व विज्ञान या दोन्हीही बाबीचा समावेश या विषयात केला जातो. त्यामुळे महिलांच्या अंगी कौशल्य विकासही होतो.त्याचबरोबर तिला वैज्ञानिक, तांत्रिक बाबींचे ज्ञानही मिळते.या विषयात जीवनाशी निगडित सर्व बाबींचे परिपूर्ण ज्ञान दिल्या गेल्यामुळे महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने गृह विज्ञानचे शिक्षण खूप महत्वपूर्ण ठरते.

**Key words** :- सक्षमीकरण, महिला, गृह विज्ञान, शिक्षण, विकास)

**प्रस्तावना:-**

स्त्री ही कुटुंबाचा एक महत्त्वाचा घटक आहे. तसेच ती समाजाचाही मूलभूत एकक आहे. त्यामुळे कुटुंबाचा, समाजाच्या तसेच पर्यायाने देशाच्या उन्नतीसाठी महिलांनी सबल असणे सक्षम असणे आवश्यक आहे. महिलांना शारीरिक भावनिक आर्थिक आणि सामाजिकरित्या सक्षम करण्यासाठी त्यांच्या परिपूर्ण विकासासाठी गृहविज्ञान शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. सक्षमीकरण ही एक प्रक्रिया आहे ज्याद्वारे स्त्रियांना निवड करण्याची, निर्णय घेण्याची, आर्थिक सक्षमता मिळवण्याचे तसेच समाजामध्ये पुरुषांबरोबर जगण्याचे स्वातंत्र्य देते. सक्षम महिला स्वतःचा, कुटुंबाचा, समाजाचा विकास साधू शकते. महिलांच्या सक्षमीकरणासाठीचा परिपूर्ण अभ्यास गृहविज्ञान या विषयाच्या शिक्षणाद्वारे केला जातो.

कौटुंबिक जीवन सुखी व समृद्ध जगण्यासाठी या विषयाची गरज असते. या विषयांतर्गत शिकले जाणारे विषय केवळ कौटुंबिक कार्यापुरते मर्यादित नाही तर जीवनाच्या सर्व क्षेत्रात ते उपयोगात आणले जातात. गृहविज्ञान शिक्षणाद्वारे स्त्रियांना गृहिणींच्या सर्व कर्तव्याचे सर्वोत्तर रूपात पूर्तता करण्याकरता शास्त्रशुद्ध ज्ञान प्रदान करते. गृहविज्ञान विषयाच्या शिक्षणामुळे गृहिणीला तिच्या सर्व कार्याची शास्त्रीय माहिती मिळते .या शिक्षणाद्वारे गृहिणीला आपल्या कार्याद्वारे इच्छितो प्राप्ती करण्यास तिच्या अंगी आत्मविश्वास निर्माण होतो. गृहविज्ञान एकीकडे कला आहे तर दुसरीकडे विज्ञान देखील आहे. यामध्ये कलेद्वारे सौंदर्याची अभिवृत्ती निर्माण केली जाते, दुसरीकडे घर व कुटुंब यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केल्यामुळे कुटुंब समाधी राहतेच पण कौटुंबिक जीवनात दैनंदिन समस्या वैज्ञानिक दृष्ट्या सोडवण्यास मदत होते. गृहविज्ञान अध्ययनाचा उद्देश म्हणजे महिलांचा विविध क्षेत्रातील शारीरिक, मानसीक बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक, विकास म्हणजे सर्वांगीण विकास साधने होय. या विषयाच्या शिक्षणाद्वारे महिलांच्या अंगी कौशल्याचा विकास होतो,त्याच बरोबर अर्थाजनाची संधी उपलब्ध होते .याबरोबर त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. महिलांचा विकास, त्यांचे स्वावलंबन, उत्पादन क्षमता, सामाजिक विकास, सामाजिक एकात्मता, कौशल्य विकास अर्थाजन करणे यासाठी गृहविज्ञान प्रशिक्षण हे दिलेल्या आवश्यकतांच्या शिखरावर पोहोचण्यासाठी परिपूर्ण साधन आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे**

1) गृहविज्ञान विषयाद्वारे दिले जाणारे शिक्षण याची माहिती घेणे.

2) गृहविज्ञान शिक्षणातून महिलांचे सक्षमीकरण याचा अभ्यास करणे.

3) गृहविज्ञान शिक्षणातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरण याचा अभ्यास करण

4) गृहविज्ञान शिक्षणातून महिलांच्या स्व-विकास याबद्दल जाणून घेणे

**तथ्य संकलन:-**

सदर संशोधनात तथ्य संकलनाच्या दुय्यम स्रोतांचा वापर केला आहे.गृहविज्ञान विषयातून दिले जाणारे शिक्षण गृहविज्ञान शिक्षण हे एक महत्त्वपूर्ण क्षेत्र आहे. जे महिलांना त्यांच्या जीवनशैली आरोग्य, आर्थिक समृद्धी, तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सशक्त बनवण्यास मदत करते .महिलांचे सबलीकरण म्हणजे त्यांना त्यांच्या हक्काचा उपयोग करण्यासाठी सक्षम बनवणे.आणि हे या विषयाच्या शिक्षणातुन शक्य होते . या विषयाच्या शिक्षणामुळे कुटूंबाची आणि समाजाची मुख्य आधारशीला असलेल्या महिलांना केवळ घरातील कामे नाही तर समाजिक क्षेत्रामध्ये सशक्त योगदान देण्याची क्षमता मिळते . गृहविज्ञान शिक्षणामुळे महिलांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माहितीद्वारे आजच्या तांत्रिक युगातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम बनवता येते. गृहविज्ञान शिक्षण हे केवळ महिलांना शिक्षित करत नाही तर,कुटूंबातील व बाह्य जगात बदलनाऱ्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यास सक्षम करते. गृहविज्ञान शिक्षणामध्ये महिलांच्या उद्योजकतेला चालना देण्यावर भर दिला जातो .या शिक्षणातुन अन्न संरक्षण, कापड उत्पादन, हस्तकला अन्न व पोषण, गृहकला,आधारित रोजगार तसेच अनेक प्रकारचे स्वयंरोजगार यासारख्या क्षेत्रांचा परिपूर्ण अभ्यास करून त्याबद्दलचे ज्ञान व व्यवहारिक कौशल्य प्राप्त करून दिली जातात. कौशल्य आधारित प्रशिक्षण या विषयांतर्गत दिले जाते. गृहविज्ञान शिक्षणाद्वारे महिलांना आर्थिक साक्षरता तर मीळतेच त्याचबरोबर विविध संसाधनाचे व्यवस्थापन करून लहान व्यवसाय सुरू करण्यास आणि आर्थिक स्थिरतेत योगदान देण्यास सक्षम करते. याव्यतिरिक्त गृहविज्ञान विषय महिलांना भेडसावत असणाऱ्या समस्यांना सोडवण्यावर प्रकाश टाकते. या विषयाच्या शिक्षणातून अनेक धोरणांची,कायद्याची,योजनाची माहिती मिळते. त्याचा उपयोग महिलांना सक्षमीकरणा साठी होतो. तसेच महिलांना सामाजिक, आर्थिक स्थिती वाढवण्यासाठी मदत होते.

गृहविज्ञान विषयातून आहारशास्त्र, वस्त्रशास्त्र, गृहव्यवस्थापन, आरोग्य अर्थव्यवस्था, बालसंगोपन, गृहसजावट, सामाजिक सामुदायिक सेवा, धर्म, कला, संस्कृती इत्यादी चे शिक्षण दिले जाते. गृहविज्ञान शिक्षण महिलांच्या कुटुंबाच्या गरजांवर लक्ष केंद्रीत करते.एकूणच गृहविज्ञान शिक्षणाद्वारे महिला आत्मनिर्भर बनतात. तसेच महिलांचे सक्षमीकरण होते.

**गृहविज्ञान शिक्षणातून स्वयं रोजगार व महिलांचे सक्षमीकरण**

गृहविज्ञान हा विषय दैनंदिन जीवनाशी संबंधित असल्यामुळे या विषयाचा कल व्यवसायभिमुख होण्याकडे आहे. गृहविज्ञान विषयात शिक्षणाचा कल अर्थाजनाच्या दृष्टीने आहे. गृहविज्ञान स्वतंत्र विज्ञान शाखा असून यामध्ये गृह सजावट, पाककला, आहारउपचार, गृहअर्थशास्त्र, वस्त्रशास्त्र, बाल विकास, बालसंगोपन, बाल मानसशास्त्र, आरोग्यशास्त्र इत्यादी विषयाचा अभ्यास केला जातो. आणि या विषयाशी निगडित अनेक रोजगाराच्या तसेच स्वयंरोजगाराच्या संधी महिलांना उपलब्ध होतात प्रात्यक्षिकाच्या, माध्यमाने तिला त्या स्वरूपाचे प्रशिक्षण दिले जाते.

1. अन्न उद्योग

अन्न ही मानवाची मूलभूत गरज आहे. गृहविज्ञान विषयात आहाशास्त्राचे शिक्षण देताना अन्नतील पोषक घटक कोणते आहेत. शरीराला आवश्यक पोषक घटक कोणते व त्याची प्राप्ती कोणत्या अन्न पदार्थातून होते, कमी खर्चात सकस आहार कसा बनवायचा. त्याची खरेदी, संग्रह, अन्न शिजवण्याच्या योग्य पद्धती,अन्न सुरक्षित तसेच अन्न टिकवण काळ वाढवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पद्धती . याचे शास्त्रशुद्ध व अत्याधुनिक ज्ञान दिले जाते. तसेच या उद्योगासाठी अधिक भांडवल, यंत्रसामग्री गरज नसते. कौशल्ययाचा वापर करून छोट्या स्वरूपात या उद्योगांची सुरुवात करता येते त्यातील काही उद्योग पुढीलप्रमाणे -

अ) खाद्यपदार्थ तयार करून विकणे

आधुनिक काळात तयार खाद्यपदार्थ विकत घेण्याकडे कल वाढलेला आहे, त्यामुळे गृहविज्ञान शिक्षण घेतलेली महिला शहरात शिक्षणाकरता येऊन राहणारे विद्यार्थी, नोकरी करणाऱ्या स्त्रिया, नोकरीतील बदलीमुळे कुटुंबाबाहेर राहणारे स्त्री-पुरुष यांच्याकरिता जेवणाचे डबे तयार करून विकू शकते. तसेच खानावळ सुरू करू शकते. तसेच सण-समारंभासाठी खारट गोड पदार्थ तयार करून देणे, इडली ढोकळा, थालीपीठ, चकली, शेव, चिवडा, लाडू यासारखे पदार्थ करून विकणे असे व्यवसाय करू शकते.

ब) संरक्षित अन्नपदार्थ तयार करणे

अन्न तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेले डबा बंद व संरक्षण अन्नपदार्थची मागणी सतत वाढत आहे. फळापासून तयार केलेले जॅम, जेली, फळांचे रस, मुरंबा लोणची तसेच ब्रेड, बिस्किट, केक, सारखे पदार्थ तयार करून विकण्याचा व्यवसाय करता येतो.

त्याच बरोबर वर्षभर टिकणारे बरेच पदार्थ जसे की वेगवेगळ्या धान्याचे पापड, शेवया, कुरुड्या, चकल्या, सांडगे, मसाले, तिखट पावडर आवळा सुपारी, इ. पदार्थ तयार करण्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण गृह विज्ञान या विषयात मिळत असल्यामुळे, यासारखे टिकणारे पदार्थ तयार करून मागणीप्रमाणे विकता येतील व अर्थाजन करता येईल.

1. आहारोपचार केंद्र

आजच्या काळामध्ये मधुमेह, हृदयरोग, रक्तदाब, रक्तक्षय या आजारांचे प्रमाण वाढलेले दिसते. याकरिता आहारामध्ये योग्य बदल करून नियंत्रित आहार देणे आवश्यक असते. आहारशास्त्रांचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थिनींनी आहारोपचार केंद्र सुरू करून मागणीप्रमाणे वजन, उंची नुसार आहार आयोजन तयार करून देऊ शकतात.

2. वस्त्र उदयोग

सौंदर्याच्या व सुरक्षितेच्या दृष्टीने कपड्यांना अतिशय महत्त्व आहे. वस्त्रांविषयीचे परिपूर्ण ज्ञान गृहविज्ञान शिक्षणाद्वारे दिले जाते. त्याचबरोबर कपड्यांचे शिवणकाम, भरतकाम, विणकाम इत्यादीचेही ज्ञान दिले जाते. त्यामुळे मुलींच्यामध्ये कौशल्य तर विकसित होतातच शिवाय या कौशल्याचा उपयोग करून अर्थाजन करता येते. वस्त्र उद्योगातील स्वयंरोजगाराच्या संधी पुढीलप्रमाणे

अ) तयार कपड्यांचे उत्पादन करणे

विविध प्रकारचे नवीन फॅशन नुसार कपडे तयार करून विकणे, शाळेची गणवेश तयार करणे, विविध पद्धतीचे पडदे, सोफा कव्हर तयार करणे, मागणीप्रमाणे कपडे शिवणे व त्याची विक्री करणे या सारख्या व्यवसायाची निवड करता येते.

ब) फॅशन डिझायनर

बदलत्या फॅशन नुसार कपड्यांची निर्मिती करणे, फॅशन प्रचलित आणण्याच्या दृष्टीने फॅशन शो, फॅशन प्रदर्शनाचे आयोजन करणे, फॅशन डिझाईनचे वर्ग सुरू करणे, यासारखे व्यवसाय गृहविज्ञान विषयाची विद्यार्थिनी सुरू करू शकते.

क) भरतकाम करणे

प्रांतीय भरतकलेचे नमुने, विविध टाक्याचा वापर विविध कापडावर करून भरत काम केल्यास अशा कपड्यांना बाजारपेठ मध्ये भरपूर मागणी आहे. काश्मिरी फुलकारी, कांथावर्क, चिकनकरी, याला विशेष प्रतिसाद मिळतो. या टाक्यांचा वापर करून साडी, ड्रेस, फ्रॉक वर भरत काम करून देणे हे काम विद्यार्थिनी करू शकतात.

ड) कलाकुसरीच्या वस्तू तयार करणे

लग्न, बारसे यासारख्या समारंभांकरीत रुकवत, बाळंतविडा आवश्यक असतो. तेव्हा लहान मुलांचे कपडे, स्वेटर, लग्न समारंभासाठी विशिष्ट कपडे यासारखे व्यवसाय सुरू केल्यास वस्तूंना मोठ्या प्रमाणात मागणी प्राप्त होते.

याशिवाय पिको-फॉल सेंटर, कपड्यांना ड्रायक्लिनिंग, रोल प्रेस करून देणे. लेदर पर्स, प्रवासाकरता बॅग, ऑफिस बॅग तयार करणे. कॉन्फरन्स फाईल तयार करणे, विणकाम, शिवणकाम,भरतकामाचे स्वतंत्र वर्ग चालवणे, इत्यादी व्यवसाय गृहविज्ञान विषयाची विद्यार्थी करू शकते.

3. गृहव्यवस्थापन

गृहविज्ञानातील गृहव्यवस्थापन या विषयाअंतर्गत अर्जित ज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांनी खालील व्यवसाय कमीत कमी साधनांचा वापर करून यशस्वी पूर्ण करू शकते.

अ) गृह सजावट करणे

आधुनिक काळात घर बांधल्यानंतर गृह सजावट करण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. यामध्ये फर्निचरची निवड व मांडणी, फर्निचर तयार करणे, पडद्यांची निवड व प्रकार, तळ अच्छादने, प्रकाश योजना, खोलीनुसार रंग योजना, वस्तूची मांडणी, याविषयी सल्ला देणे, गृह सजावट करणे इ. कार्य गृहविज्ञान विषयाची विद्यार्थिनी करू शकते.

ब) पुष्प व्यवसाय करणे

सध्याच्या काळात पुष्प व्यवसायाला महत्त्व प्राप्त झाले, पुष्पगुच्छ तयार करणे, पुष्परचना रचना तयार करणे, लग्न समारंभ करता कार सजवणे, फ्लॉवर शॉपी चालवणे, नर्सरी तयार करणे, तसेच मोठ्या हॉटेल्स ऑफिसमध्ये पुष्परचना पुरवणे यासारखे व्यवसाय विद्यार्थिनी करू शकते.

क) ग्राहक सल्लागार केंद्र

या विषयांतर्गत ग्राहक उपयोगी सेवा, ग्राहक संरक्षण कायदे, ग्राहक कल्याण इत्यादींचे शिक्षण मिळते. त्यामुळे ग्राहकांच्या समस्यावर योग्य सल्ला देण्यासाठी ग्राहक सल्लागार केंद्र विद्यार्थीनी सुरू करू शकते.

4. मानवविकास व कौटूंबिक संबंध :-

अपत्य संगोपनाबाबत आजचे पालक जागृत आहेत. बालकाला सर्वांगीण विकास योग्य व्हावा असे त्यांना वाटत असते . या दृष्टिकोनातून गृहविज्ञानाच्या विद्यार्थिनी पुढील स्वयंरोजगार सुरू करू शकतात.

अ) पाळणाघर सुरू करणे

लहान मुलांचे संगोपन त्यांचा वाढ वविकास याचे शास्त्रशुद्ध शिक्षण या विषयात दिले जाते. त्यामुळे या विषयाच्या विद्यार्थ्यांनी पाळणाघर सहज सुरू करू शकतात .विभक्त कुटुंब पद्धती, नोकरी व्यवसाय निमित्ताने घराबाहेर असणारे पालक, यामुळे लहान बालकांना सांभाळण्यासाठी पाळणाघराच्या व्यवसाय गृहशास्त्र विषयाची विद्यार्थिनी सहज चालवु शकते.

ब) बालवाडी सुरू करणे

अडीच वर्षापासून ते सहा वर्षांपर्यंतची मुले बालवाडीत जातात. अशी बालवाडी गृह विज्ञान विषयाची विद्यार्थिनी चालू शकते. कारण मुलांचा विकास त्यांचे खेळ त्यांचा भावनिक विकास, कारक विकास याचा अभ्यास तिने या विषयांतर्गत केलेला असतो.

1. पालक सल्ला केंद्र :-

मुलांच्या विविध अवस्थांमध्ये काही समस्या निर्माण झाल्या तर काय करावे असा प्रश्न सर्वच पालकांना असतो. तेव्हा पालकांच्या समस्या सोडवण्यासाठी बाल सल्लागार केंद्र सुरू करता येईल.

गृहविज्ञान विषयाच्या शिक्षणातून प्राप्त रोजगार संधी

गृहविज्ञान विषयाचे शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना पुढील विभागात नोकरीची संधी उपलब्ध होऊ शकते.

अ) अध्यापन

गृह विज्ञान या विषयाचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनीना बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर स्तरावर अध्यापनाचे कार्य करू शकते. शिवाय सामुदायिक विकासाच्या विस्तार शिक्षणाचे निरंतर शिक्षण व प्रौढ शिक्षण तसेच अंगणवाडी यामध्ये या विषयाचा अध्यापनाला वाव आहे.

ब) आहारतज्ज्ञ

रोगांना नियंत्रित करण्यासाठी आहारोपचार हा रामबाण इलाज ठरतो. त्यामुळे सरकारी दवाखाना, खाजगी दवाखान्यामध्ये आहारोपचार करण्याकरता आहारतज्ञांची आवश्यकता भासते. तसेच गृहशास्त्राच्या शिक्षणाबरोबर आहारशास्त्राचे विशेष शिक्षण घेतले असल्यास विद्यार्थिनींची आहारतज्ञ म्हणून नियुक्ती केली जाऊ शकते. याशिवाय हॉटेल, वसतिगृह, कॅन्टीन, रेल्वे, विमान, जहाज, या सेवेतील अन्न वितरण व्यवस्था व विविध क्षेत्रांमध्ये नोकरीची संधी मिळू शकतात.

क) वस्त्रोद्योग

गृहविज्ञान विषयाचे अध्ययन केलेल्या महिलेला नोकरीच्या दृष्टीने डिझायनर व फॅशन इलेस्टटर ची संधी उपलब्ध होऊ शकते. फॅशन डिझायनिंग स्कूलमध्ये शिक्षक किंवा इन्स्ट्रक्टर म्हणून रोजगार संधी प्राप्त होते.

ड) सामुदायिक विकास

गृहविज्ञान चे शिक्षण घेतलेली विद्यार्थ्यांनी ग्रामसेविका, प्रकल्प अधिकारी किंवा प्रकल्प संचालकाचे काम करू शकते. बाल सल्लागार केंद्र, महिला व कुटुंब कल्याण केंद्र, माता बाल संगोपन केंद्र अशा शासकीय व निमशासकीय संस्थाद्वारे चालविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

इ) हॉटेल व्यवस्थापन

आधुनिक काळात गृह विज्ञानाचा अभ्यास केल्याने गृहिणीकरिता हॉटेल मॅनेजमेंट एक नवीन दालन खुले झाले आहे. हॉटेल मॅनेजमेंट व भोजन व्यवस्था यासारखे अभ्यासक्रम पूर्ण केल्यास गृहिणीला या क्षेत्रात देखील नोकरीची संधी उपलब्ध होऊ शकतात.

अशाप्रकारे गृह विज्ञानाच्या शिक्षणाने महिलांना स्वयंरोजगार तसेच रोजगार उपलब्ध होऊ शकतात. त्याद्वारे महिला आर्थिक दृष्ट्या समृद्ध होऊ शकतात. त्यामुळे त्या स्वावलंबी, सक्षम बनतात.

गृह विज्ञान शिक्षणातून महिलांचा स्व विकास

अ) निर्णय क्षमतेचा विकास

गृहविज्ञान शिक्षण आरोग्य, पोषण, अन्न, शरीरविज्ञान, वेळ व्यवस्थापन, पैशांचे व्यवस्थापन, बँकिंग, कुटुंब नियोजन, मुलांचे संगोपन, कपडे, उद्योजकता, संवाद आणि इतर अनेक गोष्टींबद्दलचे ज्ञान देत असल्याने, गृहविज्ञान शिक्षित

स्त्रीला जीवनाच्या प्रत्येक पैलूचे ज्ञान असते. आणि हे ज्ञान तिला तिचे वैयक्तिक जीवन, कौटुंबिक आणि इतर सामाजिक घडामोडींबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास सक्षम करते.

ब) कौशल्य विकास

गृहविज्ञान शिक्षणामुळे महिलांच्या मध्ये व्यावसायिक कौशल्ये, व्यवस्थापन कौशल, तांत्रिक कौशल्ये विकसित होतात.

1. आरोग्य

गृहविज्ञान शिक्षण महिलांना आरोग्यासाठीचा सर्वांगीण दृष्टीकोन प्राप्त करते. बालपणातील पोषण, पौगंडावस्था, पुनरुत्पादक वर्षे आणि वृद्धावस्था. इ ज्ञानामुळे त्यांची स्वतःची तसेच त्यांच्या कुटुंबाची पोषणा ची स्थिती समृद्ध होते.

ड) संसाधनांचा जास्तीत जास्त वापर

जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्यासाठी सर्व संसाधनांचा कार्यक्षमतेने योग्य वापर कसा करता येईल यावर गृहविज्ञान शिक्षणात भर दिला जातो. यामुळे वेळ, ऊर्जा, साहित्य आणि जागेचा अपव्यय कमी होतो.

**निष्कर्ष**

गृहविज्ञान शिक्षणाचा घर व कुटुंब व त्याचा महत्त्वाचा घटक असलेली 'स्त्री' ही नेहमीच केंद्रबिंदू राहिलेली आहे. कौटुंबिक सुखी व समृद्धी जीवन जगण्यासाठी या विषयाचे शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. कला व विज्ञान या दोन्हीची बाजू असणारी गृहविज्ञानाचे शिक्षण हे महिलांना ज्ञान, माहिती, प्रशिक्षण देऊन त्यांच्या प्रगतीसाठीचे कार्य करते. गृहविज्ञान शिक्षण हे महिलांना सक्षमीकरणासाठी योगदान देणारे असे महत्त्वपूर्ण व सर्वसमावेशक असे शिक्षण आहे. या विषयांतर्गत आरोग्य शिक्षण, आत्मविश्वास, व्यावसायिक कौशल्य विकसित केले जाते. याद्वारे विविध रोजगार आणि उत्पन्न कमावण्याच्या संधी, विविध स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त होतात . तसेच तांत्रिक सेवा, संसाधन व्यवस्थापन, बाजारपेठ, मास मीडिया, कुटुंब नियोजन इत्यादी घटकांचे अत्यावश्यक शिक्षण देऊन महिलांना सक्षम केले जाते. त्यामुळे महिला या उत्तम गृहनिर्मितीसोबतच शिक्षिका, संशोधक, उद्योजक आणि प्रशासकही होऊ शकतात. एकूणच महिलांच्या सक्षमीकरणासाठी परिपूर्ण शिक्षण हे गृहविज्ञान विषयांतर्गत दिले जाते.

**संदर्भ**

1) कांडलकर लीला सुनील, कौटुंबिक संसाधनाची संकल्पना, नागपूर, विद्या प्रकाशन, 2012

2) वसु सुनंदा, मेहरे रजनी, गृहव्यवस्थापन आणि आंतरिक सजावट, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन, 2004 पब्लिशर्स.

3) वैरागडे उज्वला व मुळे विद्युतता, सामुदायिक विकास विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण, औरंगाबाद, विद्या बुक्स

4) वैरागडे उज्वला, लाटकर, मुळे, आधुनिक गृहव्यवस्थापन, औरंगाबाद, विद्या बुक पब्लिशर्स, 2010

5) Namrata G. Khatri*, Prashant J. Joshi, Preeti H. Dave and B. G. Patel, Empowerment of Women through Home Science Education, IJPAB, 2017, ISSN: 2320 – 7051

6)Anamika,Tyagi Garima, Role of Home Science in Rural Women Empowerment, GLOBUS Journal of Progressive Education, Jan-Jun2011 Vol.1No.1